राष्ट्रीय स्वास्थ विमा योजनेशी संबंधित सर्व प्रकरणे/बाबी" हा विषय सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : रास्वावि-२०१९/प्र.क्र.७३/कामगार ७-अ,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ११ जून, २०१९

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र.असंका-२००७/(६७३)/कामगार-७अ, दिनांक २४.३.२००८
२) शासन निर्णय क्र.सीएलए २००८/प्र.क्र.६७३ /कामगार-७अ, दिनांक २८.३.२००८
३) श्रम आणि रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचे क्र.एम-२१०२१/१४/१५-आरडब्ल्यू, दिनांक १७.३.२०१५ रोजीचे कार्यकारी आदेश व क्र.एम-१९०२३/०१/२०१५-आरडब्ल्यू दिनांक १९.३.२०१५ रोजीचे कार्यालयीन ज्ञापन.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने दारिद्र्यरेषेखालील असंघटीत कामगारांसाठी राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना दिनांक १.१०.२००७ रोजी जाहीर केली होती. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, शासन निर्णय क्र.सीएलए २००८/प्र.क्र.६७३/ काम.७अ, दिनांक २८.३.२००८ अन्वये राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना महाराष्ट्र राज्यामध्ये लागू करण्यात आली. त्यानुसार सदर योजनेशी प्रकरणे/बाबी या विभागाकडून हाताळण्यात येत होत्या. तद्नंतर, केंद्र शासनाच्या श्रम आणि रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १७.३.२०१५ च्या कार्यकारी आदेशान्वये राष्ट्रीय आरोग्य विमा अभियानाचा एक भाग म्हणून लोकहितास्तव राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना ही दिनांक १.४.२०१५ रोजीपासून कामगार व रोजगार मंत्रालयाकडून आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे जैसे थे (as-is-where-is) स्थितीमध्ये हस्तांतरीत करण्याचे आदेश दिले असल्यामुळे ही योजना राज्य स्तरावर देखील राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

असंघटीत क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या दृष्टीने श्रम आणि रोजगार मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक २८.३.२००८ अन्वये केंद्र शासन पुरस्कृत योजना म्हणून राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येत होती.

२. या विमा योजनेच्या अंमलबजावणीचे काम विकास आयुक्त (असंघटीत कामगार) कार्यालयाकडून राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना समिती, महाराष्ट्र या संस्थेमार्फत पार पाडले जात होते. सदर संस्थेचे अध्यक्ष हे प्रधान सचिव (कामगार) तर सदस्य सचिव, विकास आयुक्त (असंघटीत कामगार) हे होते. संस्थेच्या नावे भारतीय स्टेट बँक, शाखा शासकीय वसाहत, वांद्रे

(पूर्व), मुंबई ४०० ०५१ येथे बचत खाते आहे. सदर खात्यामध्ये राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना सुरु असताना, लाभार्थ्यांकडून नोंदणी फी रुपये ३०/- द्वारे प्राप्त रक्कम व त्यावर वेळोवेळी प्राप्त झालेली व्याजाची रक्कम मिळून रु.२०,७४,७८,५९७/- (रुपये वीस कोटी चौऱ्याहत्तर लाख अठ्ठ्याहत्तर हजार पाचशे सत्त्याण्णव फक्त) इतकी रक्कम जमा असून या रकमेचा वापर राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रशासकीय खर्चाकरिता नोडल एजन्सीने करावयाचा आहे.

३. दरम्यानच्या कालावधीत केंद्र शासनाच्या श्रम आणि रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १७.३.२०१५ च्या कार्यकारी आदेशान्वये "राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना" ही दिनांक १.४.२०१५ पासून कामगार व रोजगार मंत्रालयाकडून आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे जैसे थे (as-is-where-is) स्थितीमध्ये हस्तांतरीत करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे या योजनेसंबंधी राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना समिती, महाराष्ट्र या संस्थेच्या नोंदणी फीद्वारे जमा झालेली रक्कम, बँकेचे पासबुक, सर्व नस्त्या इत्यादी संस्थेच्या दायित्वासह "राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना" ही योजना राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

वरील निर्णयास अनुसरुन सदर योजनेसंबंधीची सर्व प्रकरणे/बाबी, देयके इ. कामगार विभागाकडून सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येत आहेत. या योजनेसंदर्भातील सर्व दस्तऐवज, निधी व प्रलंबित देयके यासह सर्व बाबी विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांनी तात्काळ सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत कराव्यात व त्याचा अहवाल कामगार विभागाकडे पाठवावा. तद्नंतर या योजनेसंबंधीची पुढील सर्व कार्यवाही व योजनेचे बचत खाते सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नावावर करण्याची प्रक्रिया त्या विभागाने पूर्ण करावी.

४. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०६११५२८१२२९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dr.Shrikant L. Pulkundwar

Digitally signed by Dr.Shrikant L. Pulkundwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=feb24b5f5d1512bb47f7bae5ad1db4953358cd43c999bdf0814c6bb78364d50a, serialNumber=c10a1e6c8fbe08c1180978bd3ed8a151ed05202d522b09b9960341c2f080906d, cn=Dr.Shrikant L. Pulkundwar
Date: 2019.06.11 15:53:13 +05'30'

(डॉ.श्री.ल.पुलकुंडवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र यांचे सचिव (पत्राने),

२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद, विधान भवन, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व विधानसभा/विधान परिषद सदस्य, विधान भवन, मुंबई,
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
९. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११.प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक, मुंबई,
१४.कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१,
१५.विकास आयुक्त (असंघटीत कामगार), कामगार भवन, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१,
१६.सर्व सह/उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७.सर्व सह कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१,
१८. सर्व कामगार उप आयुक्त, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१,
१९.माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२०.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२१.सर्व अवर सचिव/कार्यासन अधिकारी, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२.निवड नस्ती/कार्यासन ७अ.